श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

एप्रिल २०२४ | वर्ष – १२, अंक – ४ | मासिक, पाने १२ | Regn. no. - MAHMAR/2022/86035

## कर्करोगांवरील उपचारांना नवे बळ

### आय.आय.टी. मुंबई, टाटा रुग्णालयाच्या संयुक्त संशोधनात डॉ. श्रीपाद बाणावली यांचा महत्त्वाचा सहभाग




*मा. राष्ट्रपती महोदया द्रौपदी मुर्मू, मा. श्री. रमेश बैस, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, श्री. शुभाशीष चौधरी (आय.आय.टी., मुंबई) श्री. संदीप गुप्ता (टाटा मेमोरिअल सेंटर) आणि अन्य मान्यवर.* ***डॉ. श्रीपाद बाणावली (मागील रांगेत, उजवीकडून तिसरे)***

देशात कर्करोगाचे (कॅन्सर) वाढते प्रमाण हा चिंतेचा विषय बनला आहे. कर्करोगावरील उपचारांबाबत विविध प्रकारे संशोधन सुरू असून, त्यातून रुग्णांसाठी दिलासादायक काही बाबीही समोर येत आहेत. औषधोपचारांच्या माध्यमातून शरीरातील पांढऱ्या पेशींचे रोगप्रतिकारशक्तीमध्ये रूपांतर करून कर्करोगाच्या, अर्थात कॅन्सरच्या पेशींना मारण्यास उद्युक्त करणारी जगभरामध्ये प्रचलित असलेली 'सीएआर–टी सेल' म्हणजेच टी पेशीआधारित उपचारपद्धती आता भारतातही उपलब्ध झाली आहे. आयआयटी, मुंबई येथे ४ एप्रिल रोजी झालेल्या एका विशेष कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या उपचारप्रणालीचे लोकार्पण करण्यात आले. मागील काही वर्षांपासून कॅन्सरवरील 'सीएआर–टी सेल' म्हणजेच टी पेशीआधारित उपचारपद्धतीविषयी संशोधन सुरू होते. आयआयटी, मुंबई आणि टाटा मेमोरियल रुग्णालय यांनी संयुक्तपणे विकसित केलेल्या या उपचारपद्धतीमुळे हजारो कर्करोगग्रस्तांना दिलासा मिळणार आहे. विकसित देशांमध्ये उपलब्ध असलेली ही उपचारपद्धती अत्यंत खर्चिक आहे. मात्र भारतातील 'सीएआर–टी सेल' उपचारप्रणाली जगातील सर्वांत किफायतशीर असल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी समाधान व्यक्त केले. आयआयटी, मुंबई

आणि टाटा मेमोरियल रुग्णालयासह 'इम्युनोॲक्ट' या उद्योग क्षेत्राच्या सहकार्याने भारतात प्रथमच ही उपचारप्रणाली विकसित करण्यात आली आहे.

कार्यक्रमाला राज्यपाल मा. श्री. रमेश बैस, आयआयटी, मुंबईचे संचालक प्रा. शुभाशीष चौधरी, टाटा मेमोरिअल सेंटरचे संचालक प्रा. सुदीप गुप्ता, शैक्षणिक-पायाभूत सुविधा विभागाचे उपसंचालक प्रा. एस. सुदर्शन, वित्त आणि परराष्ट्र विभागाचे उपसंचालक प्रा. के. व्ही. के. राव, आयआयटी, मुंबईच्या जैवविज्ञान आणि जैवअभियांत्रिकी विभागातील प्रा. राहुल पुरवार तसेच टाटा मेमोरियल केंद्रातील डॉ. हसमुख जैन आणि शस्त्रक्रिया विभाग तज्ज्ञ डॉ. गौरव नरुला, टाटा कॅन्सर रुग्णालयाचे संचालक आणि अधिष्ठाता (शैक्षणिक) डॉ. श्रीपाद बाणावली हे मान्यवर उपस्थित होते.

डेरवण येथील वालावलकर रुग्णालयाचे डॉ. बाणावली यांचा या उपचारपद्धतीतील संशोधनात महत्त्वाचा वाटा आहे. ही उपचारपद्धती म्हणजे शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील सहकार्याचे उत्कृष्ट उदाहरण असल्याचे राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात नमूद केले. 'भारतात पहिल्या जनुकीय उपचारप्रणालीची सुरुवात हे कॅन्सरविरोधातील लढ्यातील महत्त्वाचे यश आहे. किफायतशीर दरात उपलब्ध होणारी ही उपचारप्रणाली असंख्य कॅन्सरग्रस्तांना नवजीवन देईल!' असा विश्वास राष्ट्रपती मुर्मू यांनी या वेळी व्यक्त केला. राज्यपाल रमेश बैस यांनीही या कामगिरीबद्दल आयआयटी मुंबई, टाटा मेमोरियल केंद्र आणि इम्युनोक्ट यांचे अभिनंदन केले. टाटा मेमोरियल केंद्राचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता यांनी पहिल्या स्वदेशी सीएआर-टी सेल उपचारपद्धतीसाठी आयआयटी (मुंबई) आणि टाटा मेमोरियल केंद्र यांच्यातील हा समन्वय अतिशय उपयुक्त ठरल्याबद्दल आपल्या भाषणात समाधान व्यक्त केले. भारतात उपलब्ध झालेली 'सीएआर-टी सेल' उपचारप्रणाली परदेशात उपलब्ध असलेल्या अशा सुविधांच्या तुलनेमध्ये कमी खर्चामध्ये कॅन्सरग्रस्त रुग्णांचा जीव वाचवण्यास साह्य करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. स्वदेशी पद्धतीने पेशी-आधारित उपचारपद्धती विकसित करणाऱ्या जगातील निवडक देशांमध्ये भारताचा समावेश झाल्याचे आयआयटी, मुंबईचे संचालक प्रा. शुभाशीष चौधरी यांनी सांगितले.

### कशी आहे उपचारपद्धती?

सीएआरटी सेल कर्करोगाशी लढण्यासाठी एक प्रकारची इम्युन थेरपी आहे. आपल्या शरीरातील पांढऱ्या पेशी शरीराचे कोणत्याही आजारापासून संरक्षण करीत असतात. कर्करोगाच्या पेशींशीही त्या लढतात. पण काही वेळा रक्ताच्या कर्करोगासारख्या (ब्लड कॅन्सर) दुर्धर रोगामध्ये किंवा अन्य काही विशिष्ट कॅन्सरमध्ये ही प्रतिकारशक्ती कमी होते. टी सेलचे काम हवे तसे, हव्या त्या प्रमाणात होत नाही. त्याला वेगवेगळी कारणे आहेत. 'सीएआर-टी' सेल या उपचारपद्धतीमध्ये शरीरातील टी सेल बाहेर काढले जातात आणि बाहेरून प्रयत्न करून या पेशींची कार्यक्षमता वाढविली जाते. ब्लड कॅन्सरवर उपचार करण्यासाठी, 'सीडी नाइन्टीन' या नावाचा एक रिसेप्टर असतो, जेनेटिक इंजिनीअरिंगद्वारे तो या टी सेलमध्ये घातला जातो. त्यामुळे या टी सेल कॅन्सरच्या पेशींच्या जवळ जाऊन त्यांचा नायनाट करू शकतात. म्हणजेच या उपचार पद्धतीद्वारे टी सेलची काम करण्याची क्षमता वाढविली जाते. त्यांचे काम हवे तेवढे प्रभावीपणे होत नसल्याने या उपचारपद्धतीद्वारे त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ केली जाते. ही उपचारपद्धती रुग्णांना एकदाच द्यायची आहे. ज्याप्रमाणे रक्त दिले जाते, किंवा बोन मॅरो दिले जाते त्याच प्रकारे एकदाच ती देण्यात येणार आहे.

### पूर्णपणे 'ह्युमनाइज्ड'

कर्करोगावरील ही उपचारपद्धती जगभरातील विकसित देशांमध्ये वापरली जाते. परंतु भारतात पहिल्यांदाच आयआयटी, मुंबई आणि टाटा रुग्णालय यांच्या सहकार्याने हे साकार होऊ शकले आहे. मुख्य म्हणजे ही पूर्णपणे 'ह्युमनाइज्ड' (मानवी) आहे. एरव्ही आधी प्राण्यांवर, नंतर माणसांवर याच्या चाचण्या केल्या जातात. या संपूर्ण प्रक्रियेला, प्रयोगांना बराच काळ लागतो. जवळपास सात-आठ वर्षांपासून यावर संशोधन सुरू आहे. भारताचे औषध नियंत्रक ('डीजीसीआय' ड्रग्ज कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया) यांच्याकडून ऑक्टोबर २०२३ मध्ये या उपचारपद्धतीला आणि त्याचे व्यावसायिकदृष्ट्या उत्पादन करण्याला मान्यता मिळाली आहे. या संशोधनाला सुरुवात झाली होती आयआयटी, मुंबईमध्ये. त्यानंतर टाटा रुग्णालयाच्या सहकार्याने ते पूर्ण झाले. आयआयटीतील डॉ. राहुल पुरवार यांनी याबाबतचे संशोधन सुरू केले होते. त्यानंतर टाटा रुग्णालयामधून डॉ. गौरव नरुला, डॉ. हसमुख जैन, डॉ. श्रीपाद बाणावली आणि अन्य तज्ज्ञांनी यामध्ये आपला मोलाचा वाटा उचलला. या संशोधनातील प्राण्यांवर करण्यात येणारे प्रयोग टाटा रुग्णालयात झाले होते.

### डॉ. बाणावली यांची महत्त्वाची भूमिका

वैद्यकीय ऑन्कोलॉजी विभागाचे तत्कालीन प्रमुख या नात्याने डॉ. श्रीपाद बाणावली यांनी त्यांचे सहकारी डॉ. गौरव नरुला आणि डॉ. हसमुख जैन यांना सेल्युलर थेरपीच्या संशोधनाचे काम करण्यासाठी प्रोत्साहित करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. या प्रकल्पासाठी विविध नियामक मंडळे, प्राधिकरण यांच्याकडून मंजुरी मिळविण्यातही डॉ. बाणावली यांचे मोलाचे साहाय्य झाले.

याविषयी बोलताना डॉ. श्रीपाद बाणावली, संचालक, अधिष्ठाता (शैक्षणिक) टाटा कॅन्सर रुग्णालय म्हणाले, ‘‘कर्करोगावरील संशोधनाविषयीची माहिती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे पाठविण्यात आली. हजारो कर्करोगग्रस्त रुग्णांना जीवनदान देणारी उपचारपद्धती अत्यंत मोलाची असल्याने देशाला ती समर्पित करण्यासाठी खुद्द राष्ट्रपतींनी पुढाकार घेतला. देशातील दोन बड्या, नामवंत संस्थांनी भारतामध्ये तयार केलेली अशा प्रकारची ही पहिलीच उपचारपद्धती असल्याने राष्ट्रपतींना याचे विशेष कौतुक वाटले. जगात या उपचारपद्धतीसाठी रुग्णाला चार कोटी रुपये एवढा प्रचंड खर्च येतो. परंतु आयआयटी आणि टाटा रुग्णालयातील संशोधकांनी केवळ ४० लाखांत हे साध्य करून दाखविले आहे. विशेष म्हणजे टाटा रुग्णालयात केवळ २६ लाखात ही उपचारपद्धती रुग्णांसाठी उपलब्ध होऊ शकेल. हजारो कर्करोगग्रस्तांना या उपचारपद्धतीमुळे अक्षरश: नवे जीवन लाभणार आहे

*(प्रेषक - श्री. हर्षल मळेकर, मुंबई, )*

# दि.६ एप्रिल रोजी ऍक्टरक मुंबई येथे शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक

शनिवार, दि. ६ एप्रिल २०२४ रोजी ऍक्टरक, मुंबई येथे भ.क. ल. वालावलकर रुग्णालयाच्या शास्त्रीय सल्लागार समितीची १७ वी बैठक पार पडली. ही समिती ग्रामीण भागातील समाजाचे प्रश्न समजावून घेणे आणि त्याकरता वैद्यकीय प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनी केलेले संशोधन यावर चर्चा व मार्गदर्शन करते. अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण अनिल काकोडकर या समितीचे अध्यक्ष आहेत. या बैठकीकरिता डॉ. काकोडकर तसेच संस्थेचे मुख्य विश्वस्त श्री. अशोकराव जोशी आणि श्री. विकासराव वालावलकर, यांच्यासह समितीचे अन्य सदस्य पद्मभूषण तिरुमालाचारी रामासामी (चेन्नई), टाटा मेमोरियल सेंटरचे डायरेक्टर (अकॅडेमिक्स) डॉ. श्रीपाद बाणावली, डॉ. रिटा मुल्हेरकर, डॉ. अरविंद नातू (आयसर, पुणे ), डॉ. चंद्रशेखर गर्दे, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. सुनील नाडकर्णी हेही उपस्थित होते. या व्यतिरिक्त ‘टाटा इन्स्टिट्युट ऑफ फंडामेंटल रिसर्च’च्या ARUMDA, हैद्राबाद येथील शाखेतील प्रोफेसर उल्हास कोलथूर व डॉक्टर महेंद्र सोनावणे हेदेखील उपस्थित होते. टाटा इन्स्टिट्युट ऑफ फंडामेंटल रिसर्च आणि वालावलकर महाविद्यालय यांच्या सहकार्याने होणाऱ्या सर्व संशोधन उपक्रमाची माहिती त्यांनी सादर केली.



*पद्मविभूषण डॉ. काकोडकर शास्त्रीय सल्लागार समितीमध्ये मार्गदर्शन करताना*



*शास्त्रीय सल्लागार समितीच्या बैठकीत सहभागी (डावीकडून )- श्री. विकासराव वालावलकर, डॉ. बाणावली, डॉ. नाडकर्णी, तसेच डॉ. पाटील, डॉ. मुल्हेरकर डॉ. नातू इत्यादी*

# वालावलकर रुरल मेडिकल कॉलेजच्या फायनल एम. बी. बी. एस विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



*(मागे उभा शिक्षकवृंद - डावीकडून) डॉ. वेल्हाळ, डॉ. वाघमोडे, डॉ. कुरणे, अधिष्ठाता डॉ. मानसिंगराव घाटगे, डॉ. पाटील, डॉ. लुकडे, डॉ. फड, वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. अरविंद यादव, डॉ. बारवडे, डॉ. मोडक, डॉ. चोपडे, डॉ. वाघ, डॉ. नकाते, डॉ. गोडसे (विद्यार्थी बसलेले - डावीकडून) अश्विनी ओर्पे, ज्योतिर्जय देवधर, ज्योत्स्ना वेतचा, आश्लेषा पोवळे, सृष्टी शर्मा, सोनाली गोगटे, वत्सल भालोदी, सत्येन कुलकर्णी, प्रतीक आपटे.*

वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयाचा निकाल ९५.७४% इतका लागला असून १२ विद्यार्थ्यांनी फर्स्ट क्लास संपादन केला आहे.मेडिसीनमध्ये तीन, पीडीॲट्रिकमध्ये पाच आणि सर्जरी विषयात एक अशा एकूण ९ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य संपादन केले आहे. फायनल एम.बी.बी.एस.मध्ये यश संपादन केल्याबद्दल २०१९ बॅचच्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला

कुमारी ज्योत्स्ना वेत ही ९४ मुलांमधून पहिली आली असून तिने मेडिसीन आणि पीडीॲट्रिक विषयात विशेष प्रावीण्य संपादन केले आहे. ओर्पे अश्विनी दुसरी आली असून, कुलकर्णी सत्येन याने तिसरा क्रमांक संपादन करून, पीडीॲट्रिकमध्ये विशेष प्रावीण्य संपादन केले आहे . शर्मा सृष्टी आणि गोगटे सोनाली ह्यांनी चौथा क्रमांक पटकावून क्रमशः मेडिसीन आणि सर्जरीमध्ये डिस्टिंक्शन मिळवले आहे. ज्योतिराज देवधर हा पाचव्या क्रमांकावर असून पीडीॲट्रिकमध्ये डिस्टिंक्शन संपादन केले आहे. पोवाले आश्लेषा आणि भोलोडी वत्सल ह्या दोघांना पीडीॲट्रिकमध्ये डिस्टिंक्शन मिळाले आहे. आपटे प्रतीकला मेडिसीनमध्ये डिस्टिंक्शन मिळेल आहे. महाविद्यालयातर्फे अध्यापकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचे कौतुक केले. त्यानंतर गुणवंतांच्या मुलाखतीच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय महाविद्यालय आणि पालकांचे प्रोत्साहन याला दिले आहे. कार्यक्रमाची सांगता सत्कारमूर्ती विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाली



*गुणवंत विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून द्वितीय क्रमांक मिळवलेल्या अश्विनी ओर्पे हिच्या हस्ते वृक्षारोपण सोबत अधिष्ठाता डॉ. मानसिंगराव घाटगे*



*प्रथम क्रमांक मिळवलेल्या ज्योत्स्ना वेतचा हिचा वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील ह्यांच्या हस्ते सत्कार*

# स्वयंसिद्धा प्रकल्पातील कर्मचाऱ्यांची वालावलकर रुग्णालयाला भेट




*उजवीकडून – कृष्णराव माळी, स्नेहल कारंडे, सिद्धी लाड, राजेंद्र लाड, डॉ. सिद्धेश्वर इनामदार, सौम्या तिरोडकर, डॉ. भारती अभ्यंकर, कांचनताई परुळेकर, डॉ. मोहिनी कुलकर्णी, डॉ. सूर्यकिरण वाघ, श्री. प्रफुल्ल गोडबोले, डॉ. ऋतुजा किल्लेकर, तन्वी कुडाळकर, बन्सी पटेल, डॉ. विद्या वाघ, शिव वाघ आणि प्राची मोरे*

दिनांक २१ मार्च २०२३ रोजी डॉ. व्ही. टी. पाटील फाउंडेशन, कोल्हापूर या संस्थेच्या स्वयंसिद्धा प्रकल्पातील आरोग्य विभागाच्या टीमने भ. क. ल. वालावलकर ग्रामीण रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयाला भेट दिली. या वेळी डॉ. सूर्यकिरण वाघ (सदस्य, भारतीय चिकित्सक केंद्रीय आयोग) आणि त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. सौ. विद्या वाघ यांच्यासोबत या संस्थेतील वैद्यकीय आणि इतर क्षेत्रात काम करणारे १५ कार्यकर्ते सदस्य होते.

या भेटीची सुरुवात डॉ. सुवर्णा पाटील (वैद्यकीय संचालिका भ. क. ल. वालावलकर ग्रामीण रुग्णालय) यांच्या हॉस्पिटल व ट्रस्टच्या विकासाच्या आलेखाबद्दलच्या प्रेझेंटेशनने झाली. ह्या प्रस्तुतीनंतर डॉ. सूर्यकिरण वाघ यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासाचा व संपूर्ण स्वास्थ्याचा विचार करून चालविलेले सामाजिक परिवर्तनाचे हे प्रयत्न कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहेत अशा शब्दात संस्थेच्या कामाचे कौतुक केले.

यानंतर पूर्ण गटाने वैद्यकीय महाविद्यालय, ड्रीम हेल्थपार्क, एस.व्ही.जे.सि.टी. शाळा तसेच स्पेस लॅब, स्किल लॅब तसेच इतर अभ्यासक्रम आणि मुलांच्या प्रगतीविषयी माहिती करून घेतली. या भेटीचा शेवट हा शिवसृष्टीच्या दर्शनाने झाला. या वेळी श्री. राजेंद्र लाड आपले मनोगत व्यक्त करताना असे म्हणाले की, शैक्षाणिक गुणवत्ता वाढीसाठी तसेच सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने येथे मांडलेले प्रदर्शन, एक उत्तम संग्राहलय व प्रकल्प म्हणता येईल. विशेष म्हणजे आहार व त्यांचे महत्त्व शारीरिक वाढीच्या दृष्टीने व मन संतुलित करणारे ड्रीम हेल्थ पार्कमधील प्रदर्शन हे माहितीपूर्ण आहे. याला कोकणचा ज्ञानात्मक ठेवा असेच म्हणावे लागेल! सौ. तिरोडकरताईंनी 'स्वयंसिद्धा' उपक्रमातील वेगवेगळ्या कोर्सेसची माहिती प्रेझेंटेशनद्वारे वालावलकर विद्यालयातील टीमला दिली. वरील संस्थेचे व भ. क. ल. वालावलकर संस्थेचे मूळ उद्दिष्ट हे 'महिला सक्षमीकरण' आहे. त्या अनुषंगाने दोन्ही संस्था मिळून एकत्रित प्रकल्प करण्याच्या विचारात आहेत.

# बांबू पॉलीहाऊस – कोकणवासीयांसाठी एक पर्यावरण पूरक पर्याय



*बांबू पॉलीहाउस*



*बांबू पॉलिहाऊस मधील सहकारी वर्ग*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट आणि आय.आय.टी. (मुंबई) यांनी संयुक्तपणे एक बांबू पॉलीहाऊस प्रकल्प कोकणात प्रथमच सुरु केला आहे. बांबू पॉलीहाऊस हे बांबू–आधारित पायाभूत सुविधा वापरून बनवले आहे, त्यामुळे ते परवडणारे आणि पर्यावरणास अनुकूल असे असणार आहे. हा एक नावीन्यपूर्ण आणि पर्यावरणपूरक तसेच खूपच किफायतशीर पर्याय आहे. कारण याचा प्रति चौरस मीटर बांधकाम खर्च नियमित पॉलीहाऊसपेक्षा लक्षणीय कमी आहे. या व्यतिरिक्त हा एक इको–फ्रेंडली पर्याय देखील मानला जातो .

अतिवृष्टी, वारा, प्रखर सूर्यप्रकाश, तापमानातील चढ–उतार यासारख्या प्रतिकूल हवामानापासून पिकांचे संरक्षण आणि कीटकांचे सुलभ व्यवस्थापन हा यातील मुख्य उद्देश आहे. त्याचबरोबर इतर प्राणी, माकडे, गुरे त्यापासूनही पिकांचे संरक्षण होते. या व्यतिरिक्त, बांबू पॉलीहाऊसमधील सूक्ष्म हवामान वनस्पतींच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी नियंत्रित केले जाऊ शकते, त्यामुळे जास्त उत्पन्न देणारे वातावरण तयार होते. बांबूच्या पॉलीहाऊसमध्ये विविध पिके येऊ शकतात, ज्यामध्ये हंगामी भाजीपाला आणि बागायती पिकांचा समावेश आहे. हा उपक्रम विशेषत: अतिरिक्त रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि गावकऱ्यांना त्यांच्या स्वत:च्या उपभोगासाठी ताजा भाजीपाला वाढवून त्यांना पुरेसे पोषण मिळण्यासाठी पर्याय उपलब्ध करून देणे या दुहेरी उद्देशाने तयार केला गेला आहे. श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्टकडून अशी दोन बांबू पॉलीहाऊस, त्यांच्या मूळ रचनेत थोडासा बदल करून शेतजमिनीत तयार करण्यात आली आहेत.

आय.आय.टी.(मुंबई)(CTARA विभाग) यांनी खर्चाच्या ९०% निधी दिला आणि उर्वरित १०% ट्रस्टने निधी दिला. रोज आजूबाजूच्या गावातील शेतकऱ्यांना पॉलीहाऊसला भेट देण्याकरता पाचारण केले जात आहे आणि अशी हाऊसेस उत्साही शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात निर्माण करून कोकणात पुन्हा एकदा स्वत:चा भाजीपाला स्वतःच पिकवावा याकरिता प्रोत्साहित केले जात आहे. याशिवाय प्रक्रिया केलेल्या बांबूपासून पाणी साठवण्यासाठी एक टाकीदेखील तयार करण्यात येत आहे.

# समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युटमधील विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सादर

श्री विठ्ठलराव जोशी चॅरीटीज ट्रस्ट संचालित समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युट मधील बायोमेडिकल इंस्ट्रुमेंटेशन हा पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम विभाग नेहमीच बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंट हेल्थकेअर या सेवा क्षेत्रात नवनवीन संशोधन प्रकल्प करणे, संशोधन सादर करणे आणि कॉन्फरन्समध्ये संशोधन प्रकाशित करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत असतो.

या उपक्रमांतर्गत, एफ.आर.सी. रॉड्रिग्ज इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, वाशी यांनी आयोजित केलेल्या ५व्या द्वैवार्षिक आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये बायोमेडिकल इंस्ट्रुमेंटेशन डिपार्टमेंटच्या दोन विद्यार्थी गटांनी त्यांचे संशोधन सादर केले. पदवी विभागाच्या तनुजा गीते, पल्लवी पांचाळ, रोहिणी चव्हाण, साहिल माने या विद्यार्थ्यांनी Design of Wheelchair cum Stretcher with Multifold या विषयावर आणि पदव्युत्तर विभागाच्या मृण्मयी खामकर, निहार दळवी, हरिओम वाबळे, शुभम् सावंत या विद्यार्थ्यांनी Automated




*एफ.आर.सी. रॉड्रिग्ज इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, वाशी येथे प्रथम पारितोषिक स्वीकारताना M.Sc. (बायोमेडिकल इंस्ट्रुमेंटेशन) चे विद्यार्थी मृण्मयी खामकर, हरीओम् वाबळे, निहार दळवी, आणि शुभम सावंत*

Saline Switcher Using Microcontroller Atmeg8051 या विषयावर त्यांचे प्रकल्प सादर केले.

स्वयंचलित Saline Switching Project चा उद्देश हा हॉस्पिटल किंवा क्लिनिकल कर्मचाऱ्यांचा कार्यभार कमी करणे हा आहे. यामध्ये Microcontroller आणि LDR Circuit प्रणाली, बाटल्यांमधील सलाईन पातळीचे प्रभावीपणे निरीक्षण करते आणि जेव्हा पातळी एका विशिष्ट बिंदूच्या पलीकडे कमी होते तेव्हा स्विचिंग यंत्रणा ट्रिगर करते. या डिझाईनमुळे एकाच बॉक्समध्ये अनेक सलाईन बाटल्या ठेवल्या जाऊ शकतात, प्रणाली आपोआप पहिली सलाईनची बाटली रिकामी झाल्यावर त्याची जागा दुसऱ्या भरलेल्या सलाईन बाटलीला देते. अशा प्रकारे ही प्रणाली सलाईन व्यवस्थापनाची प्रक्रिया सुव्यवस्थित करते, वैद्यकीय कर्मचाऱ्यांकडून हस्तक्षेपाची आवश्यकता कमी करते आणि मौल्यवान वेळेची बचत करते. वैद्यकीय सेवेच्या या पैलूला स्वयंचलित करून, आरोग्यसेवा व्यावसायिक त्यांचे लक्ष इतर गंभीर कार्यांवर केंद्रित करू शकतात, संभाव्यत: एकूण कार्यक्षमता आणि रुग्णांची काळजी सुधारू शकतात. या संशोधन सादरीकरणासाठी विद्यार्थ्यांना प्रथम पारितोषिकाने गौरवण्यात आले.

वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगलीच्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि संगणक विभागाद्वारे आयोजित राष्ट्रीय परिषदेमध्ये बायोमेडिकल पदवी आणि पदव्युत्तर विभागाच्या तीन विद्यार्थीगटांनी प्रकल्प सादर केले. सानिका कनगुटकर, प्रतीक बागवे, साहिल जाधव आणि सोहम् महाडिक या विद्यार्थ्यांनी Automated Massaging Chair Rehabilitation System हा प्रकल्प सादर केला. हा प्रकल्प मसाज तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एक नावीन्यपूर्ण पाऊल आहे. सेमी-ऑटोमेशन प्रोसेस आणि वैद्यकीय सेन्सर एकत्रित करून, ही खुर्ची अधिक अनुकूल आणि प्रभावी मसाजचा अनुभव देते. विशेषतः मसाज सत्रादरम्यान शरीराच्या नैसर्गिक आसनांना समर्थन देण्यावर लक्ष केंद्रित करते. अस्वस्थता किंवा दुखापतीचा धोका कमी करताना योग्य आसन मसाजचे फायदे लक्षणीयरीत्या वाढवू शकते. एकंदरीत, हा प्रकल्प स्नायूंच्या दुखण्यातून सुटकेसाठी, आराम देण्यासाठी आणि वापरकर्त्यांच्या एकूण आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी योगदान देऊ शकतो.

निहार दळवी या विद्यार्थ्याने PUJO - A Statistical Analysis of Renal Scintigraphy Parameters on 99mTc-DTP- cases हा संशोधन प्रकल्प सादर केला. या संशाधनाने केलेल्या सहसंबंध विश्लेषणामुळे विविध Renal Parameters मधील महत्त्वपूर्ण संबंध दिसून येतात, ज्यामुळे मुत्राशयातील अडथळा आणि मुत्रपिंडाच्या कार्यप्रणालीमधील परस्परसंवादावर प्रकाश पडतो. Renal Parameters यांच्यातील महत्त्वपूर्ण सहसंबंध हे अडथळ्याची



पोस्टर प्रेझेंटेशन करताना - निहार दळवी, शुभम सावंत, मृण्मयी खामकर, आणि हरीओम् वाबळे,



पोस्टर प्रेझेंटेशन करताना - पल्लवी पांचाळ, साहिल माने, रोहिणी चव्हाण, तनुजा गिते - B.Sc. (बायोमेडिकल इंस्ट्रुमेंटेशन)

तीव्रता आणि Renal functional parameters मधील थेट संबंध सूचित करतात. हे निष्कर्ष उपचारांच्या निर्णयांवरही परिणाम करतात. प्रत्येक किडनीतील अडथळ्यामुळे प्रभावित होणारे विशिष्ट Renal Parameters ओळखून, डॉक्टर सुधारात्मक उपचार अधिक प्रभावीपणे तयार करू शकतात, संभाव्यत: रुग्णाच्या आरोग्यामध्ये सुधारणा करू शकतात. एकंदरीत, हा अभ्यास PUJ अडथळा व्यवस्थापित करण्यासाठी, क्लिनिकल निर्णय घेण्याचे मार्गदर्शन करण्यासाठी आणि रुग्णाची काळजी घेण्यासाठी सर्वसमावेशक मूल्यांकन आणि परस्परसंबंध विश्लेषणाचे महत्त्व अधोरेखित करतो.

हरिओम वाबळे याने Automated Shirodhara Mechanism Using ATMega8A या विषयावर संशोधन सादर केले. यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानासह होमिओपॅथी व आयुर्वेद यांसारख्या पारंपारिक वैद्यकीय पद्धतींचा अंतर्भाव केला आहे. ॲलोपॅथिक उपचार आणि निदानासाठी तंत्रज्ञानामध्ये लक्षणीय प्रगती झाली असली तरी, होमिओपॅथिक आणि आयुर्वेदिक उपचारांमध्ये तंत्रज्ञानाचा समावेश करण्यावर त्या तुलनेने कमी लक्ष केंद्रित केले गेले आहे. शिरोधारासारख्या आयुर्वेदिक उपचारांवर लक्ष केंद्रित करून आणि नियंत्रण आणि ऑटोमेशनसाठी मायक्रोकंट्रोलरचा वापर करून तयार केलेला प्रकल्प हा स्तुत्य उपक्रम आहे. प्रक्रियेत वापरलेल्या तेलाचे मापन, फिल्टर आणि पुनर्वापर करून, ते केवळ त्याचा अपव्यय कमी करत नाही तर उपचार प्रक्रियेत सातत्य आणि अचूकता सुनिश्चित करण्यास मदत करते, तसेच मानवी त्रुटीची शक्यता कमी करते. आयुर्वेदिक प्रक्रियेचे गुंतागुंतीचे स्वरूप आणि तंतोतंत वापराचे महत्त्व लक्षात घेता, या पद्धतीने तंत्रज्ञान एकत्रित केल्याने आयुर्वेदाच्या पारंपरिक पद्धती आणि तत्त्वांचा आदर करून उपचारांची कार्यक्षमता आणि परिणामकारकता वाढू शकते.

या संशोधनासाठी मुलांना प्रा. प्रज्ञा गोखले, प्रा. रोहन गुप्ते आणि प्रा. श्रद्धा गुप्ते यांचे मार्गदर्शन मिळाले; तसेच संस्थेच्या शैक्षणिक संचालिका शरयू यशवंतराव आणि मार्गदर्शिका डॉ. नेहा देशपांडे यांचे प्रोत्साहन नेहमीच लाभत असते.

असे प्रकल्प विद्यार्थ्यांना तांत्रिक आणि आरोग्य सेवेच्या दृष्टिकोनातून सक्षम बनवतात आणि यासाठी बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन विभाग सर्व विद्यार्थ्यांना सर्व स्तरावर प्रोत्साहित करतो आणि नवनवीन संशोधन प्रकल्पांद्वारे ज्ञान आत्मसात करण्यास आणि त्याची अंमलबजावणी करण्यास त्यांना मदत करतो.



Automated Massaging Chair Rehabilitation System



"Automated Shirodhara Mechanism'



Wheelchair cum Stretcher with Multifold

# दासनवमी निमित्त पाठांतर स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात साजरा



*प्रमुख पाहुण्या सौ. ऋजुता वाळिंबे दीप प्रज्वलन करताना, सोबत सौ. यशवंतराव, श्री. शेंबेकर आदी*

श्रीशिवसमर्थ गड, श्रीक्षेत्र डेरवण येथे श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर ट्रस्टच्या वतीने दासनवमीनिमित्त आयोजित पाठांतर स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून पुणे येथील समर्थ साहित्याच्या अभ्यासक सौ. ऋजुता वाळिंबे उपस्थित होत्या. आपल्या ओघवत्या वाणीने त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाची मंगलमय सुरुवात श्रीक्षेत्र डेरवण येथील ब्रह्मवृंदांनी शांतीसूक्त पठणाने केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत असताना प्रशालेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव म्हणाल्या की सद्गुरू दिगंबरदासमहाराजांच्या संकल्पनेतून १९६८पासून शाळा-शाळातून पाठांतर स्पर्धा आयोजित केली जात आहे. त्यात नैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण कार्यक्रम दासनवमीच्या दिवशी शाळांवार होत असे. त्यानंतर १९९७पासून श्रीकाकामहाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम श्रीशिवसमर्थ गड, श्रीक्षेत्र डेरवण येथे सुरू करण्यात आला. या पाठांतर स्पर्धांचे आयोजन गेली ५०हून अधिक वर्षे केले जात असून त्यामध्ये समर्थ रामदास विरचित श्री मनाचे श्लोक, आरत्या, करुणाष्टके, स्तोत्र, कवण, रामरक्षा, आदी पाठ्यमुद्दे घेतले जातात. मुलांवर लहान वयातच चांगले संस्कार व्हावेत, आचार-विचार-उच्चार शुद्ध व्हावेत हाच या स्पर्धेचा हेतू आहे असे त्यांनी सांगितले. यानंतर एस.व्ही. जे.सी.टी. इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात मारुती स्तोत्र, श्रीसद्गुरु रामचंद्रवंदनाष्टक व रामरक्षा या स्तोत्रांचे सामूहिक पठण केले.

दासनवमीच्या निमित्ताने डेरवण परिसरातील शाळाशाळांत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी पाठांतर स्पर्धा घेण्यात आल्या त्या स्पर्धांमधून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्या सौ. ऋजुता वाळिंबे यांच्या हस्ते रोख पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर प्रमुख पाहुण्या ऋजुता वाळिंबे यांनी समर्थांची उपास्य देवता असलेल्या प्रभू श्रीरामाच्या जयघोषाने आपल्या भाषणाची सुरुवात केली. नारायणाच्या बाललीलांपासून ते अगदी त्यांच्या समर्थ रामदास होईपर्यंतचा जीवनपट आपल्या मधुर वाणीतून ताईंनी उलगडला. आत्मविश्वासाला प्रयत्नांची जोड हवी, आधी कष्ट केले पाहिजेत, प्रयत्नांनी हातावरच्या रेषासुद्धा आपण बदलू शकतो, आळसाचा तिरस्कार करा, बहिरंगापेक्षा अंतरंग सुधारा, दुसऱ्याला दुखवू नका, बुद्धीच्या विकासाबरोबरच शरीराचा विकास करा, आप-पर भाव बाळगू नका, यांसारखे समर्थांच्या साहित्यातील मौलिक विचार उपस्थित श्रोत्यांपुढे सहज सोप्या शब्दात मांडले.

समर्थांच्या विचारांना जोड देत असताना प्रसिद्ध गुरु-शिष्य असलेल्या द्रोणाचार्य व अर्जुनाची गोष्ट सांगून, अर्जुनासारखं ध्येयावर लक्ष केंद्रित करून त्यासाठी लागणारा अभ्यास व सातत्याने करावे लागणारे प्रयत्न केल्यास यश नक्की पदरात पडते हा समर्थांना अपेक्षित दृष्टिकोन ऋजुताताईंनी कथेतून मांडला. पाठांतर स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे कौतुक करत असताना जे पाठ केले त्याचा हळूहळू अर्थ समजून घेण्याचे आवाहनदेखील ताईंनी आपल्या भाषणातून केले व आपली व्याख्यानसेवा समर्थ चरणी अर्पण करून वाणीला विराम दिला.

या कार्यक्रमाला डेरवण गावच्या सरपंच सौ. अक्षता मुंढेकर, केंद्रप्रमुख श्री. शेंबेकर, डेरवण परिसरातील सर्व जिल्हा परिषद शाळांचे तसेच डेरवण इंग्लिश मिडियम स्कूलचे शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. यश कापडी तर आभार प्रदर्शन सौ. धनश्री कुचेकर यांनी केले. सामूहिक वरयाचना पठणाने कार्यक्रमाची सांगता झाली व सगळ्यांना प्रसाद देण्यात आला.




*एस व्ही.जे.सी.टी. इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात मारुती स्तोत्र, श्रीसद्गुरु रामचंद्रवंदनाष्टक व रामरक्षा या स्तोत्रांचे सामूहिक पठण केले.*




*डेरवण परिसरातील शाळाशाळांत घेतलेल्या इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या पाठांतर स्पर्धांमधील पारितोषिक विजेते विद्यार्थी*




*एस व्ही.जे.सी.टी. इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांमधील पाठांतर स्पर्धांमधील पारितोषिक विजेते विद्यार्थी*



*समर्थ साहित्याच्या अभ्यासक सौ. ऋजुता वाळिंबे आपले विचार व्यक्त करताना*

# डॉ. कल्याण सुंदरम, पुणे, यांची श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट, डेरवण येथे भेट



*शास्त्रज्ञ डॉ. कल्याण सुंदरम, पुणे, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना*

शास्त्रज्ञ डॉ. कल्याण सुंदरम, पुणे, यांनी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट, डेरवण येथे नुकतीच भेट दिली. डॉ. कल्याण सुंदरम हे बिर्ला इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, रांची ह्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे पदवीधर असून, कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, पुणे येथून मेकॅनिकल इंजिनीअरिंगमध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. पुढे, फ्लोरिडा इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, अमेरिका येथून त्यांनी मेकॅनिकल अँड न्यूक्लिअर वेस्ट मॅनेजमेन्ट या विषयात डॉक्टरेट पदवी संपादन केली आहे. डॉ. सुंदरम यांना ३८ वर्षांचा व्यापक अनुभव असून त्यांनी सुमारे १२८ निरनिराळ्या प्रकल्पांवरती जागतिक पातळीवर काम केले आहे. ऑटोमोटिव्ह, डेंटल इंजिनीअरिंग, एर्गो नॉमिक्स डिझाइन, मिलिटरी इंजिनीअरिंग, संगणक शास्त्र, अन्न प्रक्रिया व कृषी शास्त्र ह्या विविध विषयांवर त्यांनी संशोधन केले असून, १४ पेटंट आणि ११०हून अधिक प्रकाशने दाखल करण्याचे श्रेय डॉ. सुंदरम यांना जाते. त्यांनी डिझाईन केलेले ऑटोमेटेड पकोडा भजी मशिन, ऑटोमेटेड डोसा मेकिंग मशीन आणि ॲपल शेल्फ लाइफ डिटरमिनेशन मशीन प्रशंसनीय ठरले आहे.

डॉ. सुंदरम यांनी डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे विविध उपक्रम जाणून घेण्यासाठी भेट दिली. बी.के.एल. वालावलकर हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी संस्थेचे समाजोपयोगी कार्य व विविध संशोधन प्रकल्प याची माहिती प्रेझेंटेशनद्वारे डॉ. सुंदरम यांना दिली. एस.व्ही.जे.सी.टी. इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी शाळेतील स्पेसलॅब, अटल टिंकरिंग लॅब, विविध कार्यशाळा तसेच समर्थ एज्युकेशनल इन्स्टिट्युटद्वारा राबविण्यात येणाऱ्या बायोमेडिकल इंस्ट्रुमेंटेशन आणि मानसशास्त्र या विज्ञान क्षेत्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची माहिती दिली.

एका ग्रामीण भागातील शाळेत एवढी आधुनिक स्पेसलॅब बघून डॉ. सुंदरम खूप आश्चर्यचकित झाले. स्पेस लॅबमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. स्पेस लॅबमध्ये ठेवलेल्या न्यूटन्स डिस्कमध्ये जसे सप्तरंग जोरात फिरवले की फक्त पांढरा रंग दिसतो तसेच, भारतीय संस्कृतीत सूर्याच्या रथाचे सात घोडे सप्तरंगी इंद्रधनुष्याला चिन्हांकित करतात आणि त्याचा न्यूटन डिस्कशी कसा संदर्भ आहे व प्राचीन भारतीय संस्कृती ही किती आधुनिक होती याची विद्यार्थ्यांना जाणीव करून दिली. तंजावूरमधील बृहदेश्वर मंदिराचे स्थापत्य वैशिष्ट्य काय आहे आणि प्राचीन काळात भारतातील स्थापत्य शैलीचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

श्रीशिवसमर्थ गड येथील मंदिर, शिवसृष्टी आणि गोशाळेला भेट दिली. तसेच एस.व्ही.जे.सी.टी. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये रायफल शूटिंगचा आनंद घेतला. एस.व्ही.जे.सी.टी. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संचालक श्री. श्रीकांत पराडकर यांच्याशी संवाद साधून प्रत्येक विद्यार्थ्याला आर्चरी शिकायला प्रवृत्त केले पाहिजे, त्याने विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते असा माझा ठाम विश्वास आहे, असे सांगत स्पोर्ट्स अकॅडमीच्या उपक्रमांची प्रशंसा केली.

प्रा. डॉ. सुंदरम यांनी शाळा व कॉलेज मधील विद्यार्थ्यांशी 'इंडियन नॉलेज सिस्टिम' या विषयावर संवाद साधला. यात त्यांनी

भारतातील प्राचीन संस्कृती, त्यातील ज्ञान, अभियांत्रिकी शास्त्र, त्याचा गौरव आपण का केला पाहिजे यावर भाष्य केले.'आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतोऽदब्धासो अपरितासउद्भिदः।।' या संस्कृत श्लोकाचे महत्त्व सांगताना डॉ. सुंदरम यांनी चांगल्या गोष्टी अथवा ज्ञान यांचा स्रोत कुठून आहे ह्याचा विचार न करता, चांगले असेल तर ते आत्मसात केले पाहिजे असे विद्यार्थ्यांना सांगितले. श्रीरामाने लक्ष्मणाला रावणाकडून नीतिशास्त्राचे ज्ञानार्जन करायला सांगितले असे त्यांनी उदाहरण दिले. भारतातील प्राचीन परंपरा या खूप उशिरा पाश्चात्त्य राष्ट्रांना समजल्या आणि त्यांनी काही प्रमाणात त्या स्वीकारल्या. हे उदाहरणासहित स्पष्ट करताना, डॉ. सुंदरम यांनी स्वतः केलेल्या संशोधनाचा दाखला दिला. या संशोधनाअंती त्यांनी असा निष्कर्ष काढला की बाळाचा मेंदू जास्तीतजास्त विकसित व्हायला सर्वोत्तम पाळणा म्हणजे भारतीय पारंपरिक साडी बांधून केलेली झोळी. मुख्यतः ही झोळी खूप कमी खर्चाची असते. झोळी अशा रीतीने बांधलेली असते की बाळाला वाटते आपण आईच्या पोटात आहोत व त्यात बाळाला कमीतकमी हालचाल करता येते व शांत झोप लागते.

भारतीय परंपरेचा दाखला देत डॉ. सुंदरम यांनी सांगितले की, बाळाचे संगोपन करताना सर्वप्रथम तीन गोष्टी बाळाला आवर्जून शिकवल्या पाहिजेत : १) श्वास घेणे (प्राणायाम), २) सावकाश द्रव पदार्थ पिणे (काय प्यावे, काय पिऊ नये हे समजावणे) आणि ३) निद्रा (किती व कशी झोप घेणे).

गुरुकुल पद्धतीवर भाष्य करताना ते म्हणाले की प्राचीन गुरुकुल पद्धतीत ध्यानधारणेला खूप महत्त्व दिले जायचे, यम-नियम शिकविले जायचे, धनुर्विद्या शिकवली जायची, ज्यामुळे मुलांचे मन एकाग्र व्हायला मदत व्हायची. यासाठी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना धनुर्विद्या शिकायला प्रोत्साहित केले तसेच संवाद कौशल्य आणि चर्चा याचे महत्त्व मुलांना पटवून दिले.

डॉ. सुंदरम भारतातील युद्धनीतीबद्दल बोलताना म्हणाले, बादशाह अकबराने महाभारतातील १८ दिवस चाललेल्या युद्धाच्या व्यूहरचनेवरून प्रेरणा घेत 'रजम्नामा' हा ग्रंथ लिहिला आणि आता सगळी राष्ट्रं ह्या प्रणालीचे अनुसरण करतात. इ.स.पूर्व सहाव्या शतकात, सुश्रुत यांचे बायोमेडिकल इंजिनीयरिंगमधील ज्ञान आणि त्यात केलेले संशोधन यावरसुद्धा डॉ. सुंदरम यांनी प्रकाश टाकला.

भारतातील प्राचीन मोजमाप पद्धतीवर बोलताना डॉ. सुंदरम म्हणाले, भारतात एक अशी पद्धत होती की गावातील घर हे त्या गावातील मंदिरापेक्षा किंवा त्या गावातील सर्वात उंच झाडापेक्षा उंच नसायचे. डॉ. सुंदरम यांनी एक संशोधन केले आणि त्यात असा निष्कर्ष काढला की जे घर खूप उंचावर असते त्या घरातील माणसे बऱ्याचदा आजारी पडतात. प्राचीन काळात, एखाद्या स्त्रीसाठी गळ्यातील हार बनवायचा असेल तर त्या स्त्रीला स्पर्श न करता माप घेण्याची पद्धत म्हणजे, तिच्या हाताच्या पंज्याच्या तीनपट लांबीचा हार केला की तो व्यवस्थित मापात असायचा. महाभारतातील द्रौपदीच्या थाळीबद्दल बोलताना त्यांनी सांगितले की पूर्वीच्या काळात अन्न शिजवताना प्रत्येक माणसासाठी एक मूठ या प्रमाणात शिजवले जाई आणि ते योग्य प्रमाणात असून वाया जात नसे.

शेवटी त्यांनी पुराणात सांगितलेल्या विमान शास्त्राबद्दल माहिती दिली आणि त्यांनी तयार केलेल्या डोसा मशीनचा विडिओ दाखविला. हे मशीन त्यांनी स्वतः बनविले असून ह्यावर १२० फूट जाळीदार डोसा खूप कमी वेळेत बनवता येतो.

आपल्या व्याख्यानाचा समारोप करताना डॉ. सुंदरम यांनी आराध्य दैवत श्री गणेशाला अर्पण करावयाच्या २१ प्रकारच्या पाने व फुलांचा वैद्यकीय उपयोग जाणून घेण्याचा प्रकल्प विद्यार्थ्यांना देऊन त्या झाडांची लागवड करण्याचा उपक्रम करण्यास प्रोत्साहित केले.



*विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद*

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले. Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५, उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035